**ठाणे वेध २०१८ ची खास आकर्षणे**

'शून्य ते शिखर' ह्या सूत्रांभोवती चौदा सत्रे, सोळा सेलिब्रिटीज.

ठाणे शहराच्या सांस्कृतिक वातावरणाच्या केंद्रस्थानी असणाऱ्या 'वेध' ह्या जीवनसंस्कार परिषदेचे यंदाचे हे सव्वीसावे आवर्तन. दिनांक ७,८,९ डिसेंबर रोजी ठाण्यातील श्री समर्थ सेवक मंडळाच्या भव्य पटांगणावर आयोजित करण्यात येणाऱ्या ह्या परिषदेच्या आकर्षक वक्त्यांमध्ये, मौलिक सत्रांची भर पडली आहे.

यंदाचा 'मॅगेसेसे पुरस्कार' मिळवणारे डॉ. भरत वाटवानी, त्यांच्या पत्नी डॉ. स्मिता वाटवानी ह्यांच्या प्रवासाची थक्क करणारी दृकश्राव्य प्रवासकहाणी हे वैशिष्ट्यपूर्ण सत्र शुक्रवारी सायंकाळी होणार आहे. ज्येष्ठ चित्रपटदिग्दर्शिका सुमित्रा भावे ह्या प्रकृति अस्वास्थामुळे येऊ शकणार नसल्या तरी बीजसंवादासाठी येणार आहेत ज्येष्ठ अर्थतज्ञ आणि उद्योजक दीपक घैसास. त्यानंतरच्या खास सत्रासाठी येणार आहेत ज्येष्ठ अभिनेत्री रोहिणी हट्टंगडी. त्यांचा जीवनप्रवास उलगडणारे सत्र वेधच्या व्यासपीठावरून प्रथमच.

वयाच्या पस्तीसाव्या वर्षानंतर चक्क बारावी करून वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या आणि त्या दरम्यान चक्क वैमानिक परवाना मिळवणाऱ्या डॉ. शारदा बापट ह्यांच्याशी एक संवादसत्र होणार आहे. पुण्याच्या वेध मध्ये त्यांच्याबरोबर डॉ. आनंद नाडकर्णी ह्यांनी केलेला संवाद सध्या समाजमाध्यमांमध्ये व्हायरल झाला असून निव्वळ चार दिवसातच सुमारे दीड लाख प्रेक्षकांनी तो पाहिला आहे. त्यांच्याशी 'थेट भेट' हे म्हणूनच यंदाच्या वेधचे आकर्षण ठरणार आहे.

लातूर जिल्ह्यातल्या शेतकरी कुटुंबात जन्माला आलेल्या श्री. रवी बापटले ह्यांची प्रेरणादायी कहाणी. हे यंदाच्या 'वेध'चे अजून एक आकर्षण. पत्रकारितेचे प्राध्यापक झालेला रवी, स्वच्छता अभियानाच्या निमित्ताने एका खेड्यात जातो आणि त्याच्या हातात ठेवला जातो सात वर्षाच्या मुलाचा मृतदेह. एच.आय.व्ही. बाधित मृत शरीरालाही गावकरी हात लावायला धजावत नाहीत. ह्या प्रसंगाने रवी बापटले ह्यांचे आयुष्य बदलले आणि आकाराला आले, 'हॅपी इंडीयन व्हिलेज' अर्थात एच.आय.व्ही. अनाथ एच.आय.व्ही. बाधित बालकांसाठीचे एक संपूर्ण विकास स्थान. 'वेध'च्या माध्यमातून महाराष्ट्रातील नेकीने काम करणाऱ्या पण प्रसिद्धीविन्मुख प्रकल्पांना मदत मिळावी ह्या हेतूने ही संपूर्ण कहाणी एका विशेष सत्रामध्ये मंडळी जाणार आहे.

देशाच्या कानाकोपऱ्यातून गुणवान व्यक्तींना शोधणाऱ्या वेधचे हे अकरा शहरांमधले एकूण ८६ वे आवर्तन. मनोविकासतज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी ह्यांनी वेधच्या व्यासपीठावरून आठशेवर संवादसत्रांमधून अनेक ख्यातनाम व्यक्तींशी संवाद साधला आहे.

गरीब वस्तीमधल्या आव्हानांशी झगडून यशस्वी झालेला 'स्लमडॉग सीए' अभिजीत थोरात, तरुण तडफदार आय.ए.एस्. अधिकारी कौस्तुभ दिवेगावकर, खाता येतील अशी कटलरी बनवणाऱ्या हैद्राबादच्या प्रज्ञा केसकर, सांगली जिल्ह्यातून जागतिक प्रतीचे हातमोजे बनवणाऱ्या स्नेहल लोंढे, ऑस्कर समितीवर निवड झालेले पहिले भारतीय तंत्रज्ञ उज्ज्वल निरगुडकर, खाजगी विमान कंपनी चालवणारे मंदार भारदे, चप्पलांचे रिसायकलींग करणारा श्रीयांस भंडारी, सिंगापूरमध्ये जाऊन 'सुपरॲप' बनवणारा निरंजन परांजपे, असे अनेक मानकरी यंदाच्या 'वेध'मध्ये सहभागी होणार आहेत.

'लक्ष्य अॅकेडमी' द्वारे भारतीय सेनादल आणि जनता ह्यामध्ये संवादाचा पूल बांधणाऱ्या अनुराधा प्रभुदेसाई ह्यांचे स्फुर्तीदायी सत्र हा देखील आहे यंदाच्या वेधच्या आकर्षणाचा खास भाग.

सामाजिक समतेसाठी झगडणाऱ्यांच्या एलजीबीटी समुदायाचे प्रतिनिधीत्व करणारे दोन कार्यकर्ते आपला प्रवास मांडणार आहेत. आय.टी. उद्योग, त्यानंतर वकील आणि मानसशास्त्रज्ञ बनलेले बिंदुमाधव खिरे आणि 'किन्नर' समूहातील कवी आणि कार्यकर्ती दिशा शेख ह्यांचा सहभाग सांस्कृतिक परिवर्तनाची नवी दिशा सांगणाराच असेल.

डॉ. आनंद नाडकर्णी ह्यांचेबरोबर मानसशास्त्रज्ञ डॉ. दीपीका दाबके आणि अभ्यासू पत्रकार रवींद्र मांजरेकर ह्या परिषदेचे सूत्रसंचालन करत असून शिल्लक प्रवेशिकांसाठी तातडीने संपर्क करावा.

इन्स्टिट्यूट फॉर सायकॉलॉजिकल हेल्थ (आय.पी.एच.)
श्री. गणेश दर्शन, ९ वा मजला, तीन पेट्रोल पंपजवळ, पांचपाखाडी, ठाणे (प) 400602
प्रवेशिकांसाठी माहिती : 9870600075 / 8104470639 (सकाळी ९ ते संध्याकाळी ७ पर्यंत)
For Online booking E-mail id : vedhthane@gmail.com
Whatsapp No. : 9870115693
मॅजेस्टिक बुक स्टॉल, राम मारुती रोड, ठाणे (प)